# पोलीस अधीक्षक कार्यालय नाशिक ग्रामीण,

पोलीस मुख्यालय आडगाव, नाशिक - पिन ४२२००३, दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१०

**E.Mail- pilcbnskr@gmail.com**


---

## प्रेसनोट

दिनांक:- ०६/०१/२०१९

## एकता, शांतता व सुरक्षिततेसाठी धावले मालेगावकर व पोलीस ग्रामीण पोलीस दल आयोजित मालेगाव मॅरेथॉनला उत्स्फुर्त प्रदिसाद

---

नाशिक ग्रामीण जिल्हा **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** यांचे संकल्पनेतुन जिल्हयातील विविध धर्मियांमध्ये एकता, शांतता, सुरक्षितता व सामाजिक सलोख्यासाठी ग्रामीण पोलीस दलातर्फे आज दि. ०६ जोनवारी २०१९ रोजी मालेगाव शहरात **''मालेगाव मॅरेथॉन पर्व-२''** चे आयोजन आयोजन करण्यात आले होते. राष्ट्रीय एकात्मता व जातीय सलोखा तसेच पोलीस व जनता संबंध अधिक वृध्दींगत व्हावे यासाठी सदर मॅरेथॉन स्पर्धा आयोजित केली होती. सदर मॅरेथॉन स्पर्धेस पहाटे ०६:०० वा. पासुनच सुरूवात झाली होती, यात शाळा महाविद्यालयातील विद्यार्थी, पोलीस व प्रशासकिय सेवेतील अधिकारी व कर्मचारी, सर्वसामान्य नागरीक, राजकिय पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते, मिडीया प्रतिनिधी व वार्ताहर, समाजसेवक तसेच सर्व जाती-धर्मियांनी एकत्र येवुन भरघोस प्रतिसाद दिला. अबालवृध्दांनीही सदर मॅरेथॉनमध्ये धावत राष्ट्रीय एकतेचा संदेश दिला. सदर मॅरेथॉनमध्ये ०३ किमी, ०५ किमी व १० किमी अंतराची दौड आयोजित करण्यात आली, दरम्यान मालेगावकरांसह जिल्हयातील सुमारे १० हजार नागरीकांनी उत्स्फुर्त प्रतिसाद नोंदविला.

मालेगाव शहरातील **पोलीस कवायत मैदान, एकत्मता चौक** परिसरात **मा.नामदार ग्रामीण विकास मंत्री श्री. दादा भुसे**, महराष्ट्र राज्य, व **मा.पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** यांचे हस्ते ध्वज दाखवत मॅरेथॉन स्पर्धेचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी मालेगाव शहराचे महापौर मा.राशिद शेख, माजी आमदार मौलाना महम्मद मुफ्ती इस्माईल, आमदार आसिफ शेख, आशियाई क्रिडा स्पर्धा सुवर्णपदक विजेत्या संजीवनी जाधव, मा.जिल्हाधिकारी नाशिक श्री. बी.राधाकृष्णन सो., नाशिक परिक्षेत्राचे मा.विशेष पोलीस महानिरीक्षक श्री. छेरिंग दोरजे सो., अपर पोलीस अधीक्षक मालेगाव श्री. निलोत्पल सो., नागपुर शहर पोलीस उपआयुक्त श्री. गजानन राजमाने, सहा.पोलीस अधीक्षक मनमाड विभाग आर. रागसुधा मॅडम, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. रत्नाकर नवले, श्री. शशिकांत शिंदे, मा.तहसिलदार मालेगाव श्रीमती देवरे, मालेगाव मनपा उपआयुक्त श्री. नितीन कापडनीस यांचेसह ग्रामीण पोलीस दलातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सदर मॅरेथॉन स्पर्धेत उपस्थित मान्यवरांनीही दौड पुर्ण करत सहभाग नोंदविला. यावेळी मालेगावातील हिंदु-मुस्लिम धर्मियांनी एकत्र येवुन राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश दिला. राष्ट्राची एकता, अखंडता व सुरक्षा आबाधित राखण्यासाठी, तसेच एकात्मतेचा संदेश ग्रामीण भागातील प्रत्येक नागरीकांपर्यंत पोहचविण्यासाठी **''रन फॉर युनिटी, पीस अॅण्ड सेफ्टी - चला आपण सर्व धावुया''** असा संदेश ग्रामीण **पोलीस अधीक्षक सो** यांनी दिला. तसेच सदर मॅरेथॉनमध्ये

सहभाग नोंदविणारे स्पर्धकांना उपस्थित मान्यवरांचे हस्ते मेडल व प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. तसेच विविध वयोगटातील एकुण ४५ विजेते स्पर्धकांना मेडल, ट्रॉफी व प्रमाणपत्र देवुन गौरविण्यात आले.

सदर कार्यक्रम प्रसंगी ढोल ताशा पथक, लेझिम पथक तसेच सांस्कृतीक तसेच पारंपारिक नृत्य पथकांनी सहभाग नोंदवित आनंद व्दिगुणीत केला. मा.पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो. यांनी मालेगाव मॅरेथॉन स्पर्धा यशस्वी होण्यासाठी सर्व मालेगावकर, उपस्थित स्पर्धक तसेच विविध शासकिय विभागाचे अधिकारी कर्मचारी, राजकिय पदाधिकारी व उपस्थित सर्व नागरीकांना ग्रामीण पोलीस दलातर्फे नवीन वर्षाच्या शुभेच्छा देत मालेगाव शहरातील जनतेने असाच जातीय सलोखा कायम ठेवावा अशी अपेक्षा व्यक्त करत सर्वांचे आभार मानले.

## मालेगाव मॅरेथॉन पर्व २ रे सन २०१९ विजयी स्पर्धक

| **१० कि.मी. विजेते** | वयोगट १५ ते २५ | वयोगट २६ ते ५० | महिला व मुली |
|---|---|---|---|
| प्रथम | देव पात्रे | भिकु खैरणार | श्रध्दा पवार |
| व्दितीय | समाधान जाधव | उत्तम मानकर | रितु आहिरे |
| तृतीय | अब्दुल्ला खलिल | डॉ यशवंत सोनवणे | वैशाल शेलार |

| **०५ कि.मी. विजेते** | वयोगट १५ ते २५ | वयोगट २६ ते ५० | महिला व मुली |
|---|---|---|---|
| प्रथम | शेख अक्रम अस्लम | नवनाथ कदम | सुवर्णा पवार |
| व्दितीय | दिपक शुक्ला | नियाज अन्सारी | स्नेहल |
| तृतीय | अभिजीत पटाईत | शाम जगताप | दिपीका बागुल |

| **०३ कि.मी. विजेते** | वयोगट १५ ते २५ | वयोगट २६ ते ५० | महिला व मुली |
|---|---|---|---|
| प्रथम | मयुर आहिरे | हरिष गायकवाड | पायल अमिपारा |
| व्दितीय | कैलास पाटील | पोपट बहिरम | वैष्णवी चव्हाण |
| तृतीय | अबु रियाज अख्तर | अजय पवार | यशस्वी पात्रे |

| **सिनीय सिटीझन विजेते** | **०३ किमी** | **०५ किमी** | **१० किमी** |
|---|---|---|---|
| प्रथम | सुधीर जाधव | जयप्रकाश जाधव | डॉ.यशवंत सोनवणे |
| व्दितीय | तुकाराम मांडवडे | शुभांगी गोसावी | काशिनाथ कापडणीस |
| तृतीय | गोकुळ आहिरे | नारायण पाटील | रविंदे हिरे |